धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोनवणे यांची युवक काँग्रेसच्या प्रदेश सचिवपदी फेरनियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ एप्रिल -**

तालुक्यातील कवठा येथील धीरज सोनवणे यांची महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या सचिवपदी फेरनियुक्ती करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी ही नियुक्ती जाहीर केली.

धीरज सोनवणे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठापूर्वक व प्रामाणिकपणे संघटनात्मक काम करत युवक काँग्रेसमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत प्रदेशाध्यक्षांनी त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवत ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सक्रिय सहभाग असून ग्रामीण भागातील युवा उद्योजक म्हणून ते धाराशिव जिल्ह्यात सुपरीचीत आहेत. युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव महेश देशमुख यांचे निकटवर्तीय म्हणूनही त्यांची ओळख आहे.



या फेरनियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून धीरज सोनवणे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### कळंब बस आगारात भीमजयंती नियोजन बैठक संपन्न

**कळंब, दि.५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी कळंब बस आगारात उत्साहपूर्ण बैठक पार पडली. यंदा जयंती उत्सवाची धुरा महिला कर्मचाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आल्याने विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बैठकीत कार्यक्रमाचे नियोजन, जबाबदाऱ्या व विविध समित्यांची रचना यावर चर्चा करण्यात आली. अध्यक्षपदी राजकन्या गवळी, उपाध्यक्षपदी वंदना पालके, सचिवपदी संध्या सोनटक्के, कोषाध्यक्षपदी सरोजा औसेकर व निवेदिता रणदिवे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी प्रियंका शिंदे व अनुराधा भोसले यांची निवड करण्यात आली. महिला कर्मचाऱ्यांना नेतृत्वाची संधी देत उत्सव अधिक शिस्तबद्ध व सामाजिक संदेश देणारा करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. बैठकीस आगारातील अनेक कर्मचारी उपस्थित होते.



### नारंगवाडी शाळेत पाणी संवर्धनाबाबत जनजागृती

**उमरगा, दि.५ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडीची वाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पाणी संवर्धनाबाबत जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. शाळेच्या परिसरात पाणी वाचवले तरच पृथ्वी वाचेल असा संदेश देणारा फलक लावून ग्रामस्थांना पाणी बचतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना पाण्याचा अपव्यय टाळणे, आवश्यक तेवढेच पाणी वापरणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलसंपत्ती जपण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सहशिक्षक उमेश गोटे यांनी आज पाणी जपले नाही तर उद्या जीवन कठीण होईल, असे सांगत जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमास मुख्याध्यापकांसह शिवाजी जमादार, प्रकाश राठोड, सुभाष सुरवसे, अंकुश भोसले, अमोल सुरवसे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### कल्पना नगरात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**कळंब, दि.५ एप्रिल -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कल्पना नगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त लिंबुनी बौद्ध विहार येथे सामाजिक कार्यकर्ते सतपाल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली.



बैठकीत जयंती समितीची निवड करण्यात येऊन अध्यक्षपदी अभिजीत जाधव, उपाध्यक्ष यश बनसोडे तर कोषाध्यक्षपदी अनिकेत कलवरकर यांची निवड करण्यात आली. जयंतीनिमित्त वक्तृत्व, निबंध, सुंदर हस्ताक्षर, सामान्य ज्ञान, स्लो सायकल, धावणे, मुला-मुलींचे नृत्य, संगीत खुर्ची, जोडी संगीत खुर्ची तसेच महिलांसाठी विशेष पैठणचा खेळ अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. बैठकीस बाळासाहेब हौसलमल, मोतीचंद बागरेचा, राजा सय्यद, संदीप सोनवणे, राकेश जगताप, तुषार रणदिवे, दादा खंडागळे, अमित जाधव, विनोद जगताप, वैभव गायकवाड, बुवा वाघमारे, सौरभ गायकवाड, लाला कांबळे, दीपक गायकवाड, नितीन आंगरखे, अनिकेत गायकवाड आदी उपस्थित होते.



### कळंब येथे हनुमान जयंतीनिमित्त हरिनाम सप्ताहाची सांगता

**कळंब, दि.५ एप्रिल -**

कसबा पेठ येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात हनुमान जयंतीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता उत्साहात झाली. यावेळी ह.भ.प. ज्ञानसिंधू संदीपान महाराज हसेंगांवकर यांनी काल्याच्या किर्तनातून परमभक्तीमुळे अहंकार नष्ट होऊन भक्त भगवंताशी एकरूप होतो, असे प्रतिपादन केले. संत ज्ञानेश्वरी यांच्या अभंगावर भाष्य करत त्यांनी भगवंताचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच वारकरी संप्रदाय समाजाला योग्य दिशा देणारा असून ढोंगीपणावर संतांनी नेहमीच टीका केल्याचे त्यांनी नमूद केले. २६ मार्च ते २ एप्रिलदरम्यान पार पडलेल्या सप्ताहात शिवपुराण कथा, कीर्तन सेवा, ज्ञानेश्वरी पारायण आदी कार्यक्रम झाले. २ एप्रिल रोजी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सव साजरा करून प्रसाद वाटप करण्यात आले. काल्याच्या किर्तनास भाविकांची मोठी उपस्थिती होती.

# कळंबमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत; न.प.च्या निष्क्रियतेविरोधात संताप

**कळंब शहरात मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव... चिमुकलीवर हल्ला... नागरिकांत भीतीचे वातावरण...**

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ एप्रिल -**

शहरात मोकाट कुत्र्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. विविध भागांत कुत्र्यांचे टोळके मुक्तपणे फिरत असल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



आज शहरातील एका गल्लीमध्ये हिंदवी किशोर मोरे या चिमुकलीवर मोकाट कुत्र्याने हल्ला करत तिच्या मांडीला गंभीर चावा घेतला.

जखम इतकी तीव्र होती की लचका तुटल्यासारखी स्थिती निर्माण झाली. तातडीने तिला ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयाच्या माहितीनुसार, कळंब शहर व तालुक्यातून दररोज सरासरी ३० ते ३५ रुग्ण कुत्र्यांच्या चाव्यामुळे उपचारासाठी येत आहेत. ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील जवळपास प्रत्येक गल्लीमध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ही कुत्री लहान मुलांच्या मागे धावतात, दुचाकीस्वारांचा पाठलाग करतात, त्यामुळे अपघातांचाही धोका वाढला आहे.

शाळा, महाविद्यालये, दवाखाने आणि गर्दीच्या ठिकाणीही त्यांचा वावर वाढल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सुप्रीम कोर्टाने मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी स्पष्ट निर्देश दिले असतानाही नगरपरिषद प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. निर्बीजिकरण व पकड मोहीम प्रभावीपणे राबवली जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणासाठी निर्बीजिकरण, पकड मोहीम आणि इतर प्रभावी उपाययोजना राबवण्याची मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

रुग्णालयात सध्या ९१७ लसींचा साठा उपलब्ध असून ए.आर.एस. लसीचे १० पॉकेट उपलब्ध आहेत. त्यामुळे रुग्णांना कोणतीही गैरसोय होणार नाही, असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनाथ धर्माधिकारी यांनी सांगितले.

तसेच कुत्रा चावल्यास विलंब न करता तातडीने रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

> **चार दिवसांत ८३ रुग्णांवर उपचार**
>
> कळंब येथील उपजिल्हा रुग्णालयात १ ते ४ एप्रिल दरम्यान एकूण ८३ रुग्णांवर कुत्र्यांच्या चाव्यामुळे उपचार करण्यात आले आहेत.
>
> **१ एप्रिल : ३३ रुग्ण, २ एप्रिल : १९ रुग्ण, ३ एप्रिल : ७ रुग्ण, ४ एप्रिल : २४ रुग्ण**

## एमआरपीपेक्षा जादा दराने विक्री; 'कूलिंग चार्ज' नावाखाली ग्राहकांची लूट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

उन्हाळ्याच्या तडाख्यात नागरिक थंड पेयांकडे वळत असताना शहरातील काही किराणा दुकानदारांकडून ग्राहकांची सरळ लूट सुरू असल्याचे समोर आले आहे. २० रुपये एमआरपी असलेल्या थनस्प, प्राईट, माझा, सारख्या कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यांवर 'कूलिंग चार्ज'च्या नावाखाली तब्बल ५ रुपये अधिक आकारून २५ रुपयांना विक्री केली जात आहे.



एमआरपी स्पष्टपणे २० रुपये असतानाही फ्रिजमध्ये थंड केलंय या कारणावरून अतिरिक्त पैसे घेतले जात आहेत. काही ठिकाणी ग्राहकांनी याला विरोध केल्यास दुकानदारांकडून उडवाउडवीची उत्तरे देत विक्रीस नकार देण्याचे प्रकारही घडत आहेत.

ग्राहक संघटनांनी या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की, एमआरपीपेक्षा जास्त दराने विक्री करणे हा ग्राहक संरक्षण कायद्याचा सरळ भंग आहे. 'कूलिंग चार्ज' नावाखाली पैसे घेणे पूर्णपणे बेकायदेशीर असून संबंधित दुकानदारांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

दरम्यान, नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत असून २० ची बाटली २५ ला का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तात्काळ धडक कारवाई करून अशा दुकानदारांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर ग्राहकांची लूट वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन तसेच स्थानिक नगरपालिकेने तातडीने तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## खा. निंबाळकर यांची ब्रह्मकुमारीज केंद्राला सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.५ एप्रिल -**

खा. ओम राजेनिंबाळकर यांनी लोहारा शहरातील शिवप्रसाद भवन येथे कार्यरत ब्रह्मकुमारीज आध्यात्मिक केंद्राला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्रातील शांत, पवित्र व आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला.

केंद्राच्या संचालिका सरिता दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या ध्यानसाधना, राजयोग मेडिटेशन, आत्मशांती व सकारात्मक विचारसरणी आदी उपक्रमांची माहिती त्यांनी जाणून घेतली. समाजात नैतिक मूल्ये व आध्यात्मिक जागृती निर्माण करण्याचे कार्य संस्थेमार्फत प्रभावीपणे सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.



यावेळी बोलताना निंबाळकर यांनी आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक शांतता व सकारात्मक विचारांची गरज अधोरेखित करत, युवक व महिलांना योग्य जीवनदृष्टी देण्यात अशा केंद्रांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. भेटीदरम्यान बाळासाहेब पाटील, अमोल बिराजदार, सुधीर घोडके, पंडित बारगळ, शेखर पाटील, सचिन रसाळ, दीपक पोतदार, अरुण माटे, राजू स्वामी, राजेंद्र सूर्यवंशी, विजयकुमार बडडाळे, प्रेम लांडगे, मधुकर सुरवसे, राम माने, आकाश विरोधे, सुग्रीव माळी, दिलीप सुरवसे, अविनाश भाई, राणी बहिणजी यांसह दैवी परिवार उपस्थित होते.

## अवैध मुरूम उत्खनन प्रकरणी मंत्रालयासमोर वाघमारे कुटुंबाचे उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.५ एप्रिल -**

तालुक्यातील डिकसळ येथील अवैध गौण खनिज (मुरूम) उत्खनन प्रकरणी सचिन सटवा वाघमारे हे कुटुंबासह मंत्रालयासमोर बेमुदत उपोषणाला बसले असून, मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी राज्यपालांकडेही निवेदन सादर केले आहे.

दि.२३ मार्च पासून सुरू असलेल्या या आंदोलनात वाघमारे दांपत्य दोन लहान मुलांसह सहभागी झाले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, डिकसळ (ता. कळंब) येथे झालेल्या अवैध मुरूम उत्खननामुळे त्यांच्या शेतीसह सिंचन विहिरीचे मोठे नुकसान झाले आहे. संबंधित प्रकरणात महसूल प्रशासनातील तत्कालीन अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे नुकसान झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वाघमारे यांनी शासनाने तात्काळ दखल घेऊन दोषींवर फौजदारी कारवाई करावी तसेच नुकसानभरपाई वसूल करून द्यावी, अशी मागणी केली आहे.

## दोन एकरांत २५ लाखांची कमाई; पंडित कदम यांची द्राक्ष शेती ठरली आदर्श



**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील उमरगा (चि.) येथील शेतकरी पंडित केरबा कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि योग्य नियोजनाच्या जोरावर द्राक्ष शेतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अवघ्या दोन एकर क्षेत्रात त्यांनी तब्बल २५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत इतर शेतकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

कदम यांच्या या यशामागे त्यांच्या कुटुंबाची मोठी साथ लाभली. पत्नी निर्मला कदम तसेच मुलं महेश आणि अविनाश यांनी खांद्याला खांदा लावून मेहनत घेतल्यामुळे कमी क्षेत्रातही अधिक उत्पादन घेणे शक्य झाले.

प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता सातत्यपूर्ण कष्ट आणि योग्य नियोजनाच्या बळावर कदम यांनी द्राक्ष बाग फुलवली. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण दोन्ही वाढवले, त्यामुळे बाजारपेठेत त्यांच्या द्राक्षांना चांगला दर मिळाला.

जिद्द, मेहनत, सातत्य आणि स्वतःवर विश्वास ठेवला तर कोणतेही अशक्य काम शक्य होते. कुटुंबाची साथ असेल तर यश नक्की मिळते, असा संदेश पंडित कदम यांनी दिला.

त्यांची ही यशोगाथा इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून, कमी क्षेत्रातही योग्य नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर भरघोस उत्पन्न मिळवता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

> **यशाची ठळक वैशिष्ट्ये...**
>
> एकूण क्षेत्र : २ एकर
> उत्पादन : सुमारे ३३ टन द्राक्षे
> विक्री दर : प्रति किलो ८० रुपये
> एकूण उत्पन्न : अंदाजे २५ लाख रुपये
> बाजारपेठ : हैद्राबाद व कोलकाता



## येडशी येथे ५० वर्षांनंतर सोमयाग यज्ञ संपन्न; भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

तालुक्यातील येडशी येथील रामलिंग तीर्थक्षेत्र परिसरातील श्री रामेश्वर देवस्थान येथे २९ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान अत्यग्निष्टोम सोमयाग यज्ञ पार पडला. तब्बल ५० वर्षांनंतर आयोजित यज्ञामुळे भाविकांची मोठी गर्दी उसळली.

या यज्ञाचे आयोजन भीष्म फाउंडेशन स्कूल ऑफ इंडियन नॉलेज सिस्टीम, पुणे व विश्व मंदिर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. विश्वकल्याण, पर्यावरण शुद्धीकरण व पंचमहाभूतांचे संतुलन साधण्यासाठी हा यज्ञ आयोजित केल्याचे सांगण्यात आले.

यज्ञाचा शुभारंभ धाराशिवच्या नगराध्यक्षा नेहा काकडे यांच्या हस्ते झाला. तसेच वाराणसी व अयोध्या येथील वेदपंडितांसह १०८ ब्राह्मणांचा सहभाग होता. मुख्य प्रवर्तक प्रा. क्षितिज पाटुकले यांनी २०२६ ते २०३५ दरम्यान १०८ सोमयाग यज्ञ करण्याचा संकल्प व्यक्त केला.

३ एप्रिल रोजी यज्ञाची सांगता झाली. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी यज्ञस्थळी भेट देऊन दर्शन घेतले व महाप्रसादाचा लाभ घेतला.

## भाजपाचे वाढते वर्चस्व : संघटनबळ आणि विकासाच्या जोरावर जिल्हा प्रगतीपथावर!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त जिल्हाभरात उत्साहाचे वातावरण असून, भाजपाचे वाढते वर्चस्व, सक्षम संघटनबळ आणि विकासाभिमुख धोरणांमुळे जिल्हा प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

धाराशिव जिल्ह्यात भाजपाकडे १ आमदार, जिल्हा परिषद अध्यक्षपद, दोन पंचायत समिती सभापती, चार नगराध्यक्ष तसेच जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि नगरसेवकांची लक्षणीय संख्या आहे.

या एकत्रित बळावर जिल्ह्यात पक्षाची पकड अधिक मजबूत होत आहे. ग्रामीण ते शहरी पातळीवर भाजपाने आपले जाळे विस्तारत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे.

जिल्ह्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची घोडदौड सुरू असून, परंडा तालुक्यातील माजी आमदार सुजीतसिंह ठाकूर आणि उमरगा तालुक्यातील माजी मंत्री बसवराज पाटील यांचेही पक्षवाढीसाठी योगदान महत्त्वाचे ठरत आहे. धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या संघटन कौशल्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे बळकट झाले आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात विविध विकासकामांना गती मिळत आहे. रेल्वे प्रकल्प, रस्ते विकास, आरोग्य सुविधा, सौर व पवनऊर्जा प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, जलसंधारण, शिक्षण आणि सिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, जल जीवन मिशन यांसारख्या योजनांमुळे गावागावांत विकास पोहोचत असून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल होत आहे.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे धाराशिव जिल्ह्याकडे विशेष लक्ष असल्याचे मानले जाते.

विविध प्रकल्पांना मंजुरी, निधी उपलब्धता आणि प्रशासनाला दिलेले मार्गदर्शन यामुळे विकासकामांना वेग आला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वयातून योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

स्थापना दिनानिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विकास आणि संघटन या दुहेरी बळावर आगामी काळात अधिक व्यापक काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

> **भाजपा पक्षाची ताकद वाढतेय...**
>
> जिल्ह्यात भाजपाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. बूथ स्तरापासून ते जिल्हा पातळीपर्यंत कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत झाले असून, नवीन कार्यकर्त्यांचा सहभाग आणि जनतेशी वाढलेला संपर्क यामुळे पक्ष अधिक बळकट होत आहे.

> **आमदार राणादादांचे राजकीय कौशल्य...**
>
> धाराशिव जिल्ह्यातील राजकीय घडामोडींमध्ये आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे नेतृत्व ठळकपणे जाणवत आहे. स्थानिक प्रश्नांची अचूक जाण, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधण्याची क्षमता यामुळे त्यांच्या नेतृत्वाचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी असलेली जवळीकही जिल्ह्याच्या विकासासाठी पूरक ठरत असल्याचे मानले जाते.

> **तीर्थक्षेत्र विकासातून रोजगाराच्या संधी...**
>
> धाराशिव जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाला गती मिळत आहे. मंदिर परिसर सुशोभीकरण, रस्ते, निवास व्यवस्था, पाणी व स्वच्छता सुविधा यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळत आहे. यामुळे हॉटेल, प्रवास, मार्गदर्शक सेवा, प्रसाद विक्री आदी क्षेत्रांत रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत असून, स्थानिक तरुणाईसाठी हा विकास महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# निलंगा तालुक्यातील ९ पाणवठे भरले, वन्यजीवांना दिलासा

## उन्हाच्या झळांमुळे वन विभागाकडून वन क्षेत्रात पाण्याची सोय, टँकरव्दारे केला जातो पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ०५ एप्रिल :** उन्हाच्या तालुक्यातील वाढत्या पार्श्वभूमीवर वन्य प्राण्यांचे हाल टाळण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेत विविध ठिकाणी पाण्याची सोय करून एक स्तुत्य उपक्रम राबवला आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे नैसर्गिक पाणवठे आटत असताना, वन विभागाकडून टैंकर व इतर साधनांच्या माध्यमातून पाणवठे भरून वन्यजीवांना मोठा दिलासा दिला जात आहे.

विभागीय वन अधिकारी धाराशिव, सहाय्यक वनसंरक्षक धाराशिव व लातूर तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी (वि.का.) लातूर आणि वन परिमंडळ अधिकारी निलंगा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. वन अधिकारी सोपान बडगणे व वनरक्षक ज्ञानेश्र्वर मंगरूळे यांच्या नेतृत्वाखाली विविध भागातील पाणवठ्यांमध्ये नियमितपणे पाणी उपलब्ध करून दिले जात आहे.





या उपक्रमामुळे परिसरातील हरण, मोर, ससे, माकडे, रानडुक्कर, सायाळ यांसारख्या वन्य प्राण्यांना मोठा दिलासा मिळत आहे. पाण्याअभावी होणारी वन्यजीवांची स्थलांतराची समस्या काही प्रमाणात कमी झाल्याचेही चित्र दिसून येत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने वन विभागाचा हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. स्थानिक नागरिक, प्राणीमित्र आणि पर्यावरण प्रेमींकडून या कार्याचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. यावेळी प्राणीमित्र हनुमान पाटील, प्रमोद पुरी, गणेश देशमुख, बाळू कांबळे, गणेश कोरे, जाफर हाश्मी, अमोल माळी आदींनी समाधान व्यक्त करत वन विभागाच्या या उपक्रमाचे स्वागत केले. भविष्यातही अशाच प्रकारे वनसंपदा आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचा निर्धार वन विभागाने व्यक्त केला आहे.

### तालुक्यातील एकाही पाणवठ्यावर पाणी कमी पडू देणार नाही

निलगा तालुक्यातील लांबोटा/केळगाव (२), रामलिंग मुदगड (१), ममदापूर (१), मिरगन हाळी (१), कलमुगळी २, टाकळी १ उमरगा (हा.) १ आदी ९ ठिकाणी पाणवट्यामध्ये पाणीची सोय केली आहे. आमचे कर्मचारी पाणवठ्याची सतत पाहणी करत आहेत. एकाही पाणवठ्यावर पाणी कमी पडू देणार नाही.

– सोपान बडगने,
वन अधिकारी, निलंगा

# संक्षिप्त...

## डॉ.सिद्राम डोंगरगे आणि प्रा.नितीन वाणी यांचा माजी विद्यार्थी संघटनेकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर:** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या नियमित प्राचार्यपदी प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यपदी प्रा.नितीन वाणी यांना नुकताच शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन पदभार देण्यात आला आहे. नवनियुक्त प्राचार्य आणि उपप्राचार्य यांचा महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघटनेकडून शाल आणि पुष्प गुच्छ यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष माजी उपप्राचार्य प्रा.कल्याण कांबळे, सचिव ॲड. इरफान शेख, माजी प्राचार्य डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, माजी विद्यार्थी प्रा.एस.एस.स्वामी, मुख्य समन्वयक डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, प्रो.डॉ.संजय गवई, डॉ.शीतल येरुळे आणि प्रा.के. आर.सूर्यवंशी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रा.कल्याण कांबळे म्हणाले की, महाविद्यालयात कार्यरत असलेली माजी विद्यार्थी संघटना व सर्व सन्माननीय सदस्य महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव तत्पर राहील. तसेच सर्व दृष्टीने सहकार्य करेल असे आश्वासित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक माजी विद्यार्थी संघटनेचे समन्वयक डॉ.सदाशिव दंदे यांनी केले तर आभार मुख्य समन्वयक डॉ.भास्कर नल्ला रेड्डी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय गायकवाड, संतोष येंचेवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि जलील सय्यद यांनी परिश्रम घेतले.

## होमगार्ड ते पोलीस : जिद्दीने मिळविले पोलीस भरतीत यश

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर :** अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत वाढलेल्या जगन साळवे या तरुणाने जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करीत जालना पोलीस दलाच्या भरतीत यश मिळवून होमगार्ड ते पोलीस असा प्रेरणादायी प्रवास पूर्ण केला आहे.

चाकूर येथील जगन विलास साळवे यांची आजी विमलाबाई, वडील कै. विलास साळवे व आई सुलोचनाबाई यांनी मोलमजुरी, भाजीपाला व फळे विक्री करून अत्यंत कठीण परिस्थितीत आपल्या पाच अपत्यांचे संगोपन केले व त्यांना शिक्षण दिले. कुटुंबातील तिसरी मुलगी रेणुका हिने दोन वर्षांपूर्वी पुणे पोलीस भरतीत यश मिळवले होते. जगन साळवे यांनी दोन वर्षे होमगार्ड म्हणून सेवा बजावत पोलीस भरतीची तयारी सुरू ठेवली आणि अखेर जालना पोलीस भरतीत यश मिळवून कुटुंबाचे स्वप्न पूर्ण केले. जिद्द, कष्ट आणि कुटुंबाच्या पाठबळावर यश मिळवणाऱ्या जगन साळवेची ही कहानी अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या यशाबद्दल बालाजी पाटील चाकूरकर यांनी जगन साळवे, त्यांची आजी विमलबाई व आई सुलोचनाबाई यांचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सत्कार केला. यावेळी युवराज आगरकर, कृष्णा साळवे तसेच फळ विक्रेते बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून सेवाभाव जोपासा; नेतृत्व घडते – डॉ. मल्लिकार्जुन करजगी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर:** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर यांच्या वतीने संचालित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक–युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाले. विविध उपक्रमांनी परिपूर्ण असलेल्या या शिबिराचा समारोप समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री. बालाजी घार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, सुप्रसिद्ध कवी व गझलकार श्री. योगीराज माने, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे माजी संचालक डॉ. दिगंबर नेटके, प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपल्या मनामध्ये सेवावृत्ती जोपासली, तर त्यांच्यातून जबाबदार आणि सजग नागरिक घडतात. विद्यार्थी दशेत नेतृत्वाचे गुण विकसित झाले, तर अशा शिबिरांच्या माध्यमातून समाजाला विविध क्षेत्रांत सक्षम नेतृत्व मिळते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात यशस्वी नेतृत्वाची पायाभरणी अशा उपक्रमांतूनच होत असते. त्यांच्या या विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव आणि नेतृत्वाची जाणीव अधिक दृढ झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गीता वाघमारे यांनी प्रभावीपणे केले. प्रास्ताविक डॉ. केशव आलगुले यांनी सादर केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद चव्हाण यांनी केले.

# किनगाव पोलीस स्टेशन येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न




**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. ०५ एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने किनगाव पोलीस स्टेशन येथे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अरविंद रायबोले साहेब यांच्या उपस्थितीत दि. ३ एप्रिल रोजी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली.या बैठकीसाठी पोलीस स्टेशन हद्दीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळाचे कार्यकर्ते, पोलीस पाटील, प्रतिष्ठित नागरिक हजर होते.



यावेळी श्री रायबोले साहेब यांनी मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व मिरवणुका शांततेत व डीजे मुक्त वातावरणात व उत्साहात पार पाडण्याचे आवाहन केले. जयंतीच्या अनुषंगाने समाज उपयोगी उपक्रम जसे, रक्तदान शिबीर, आरोग्य शिबिर, १८ तास वाचन विद्यार्थ्यांना, शालेय साहित्याचे वाटप आधी उपक्रम राबवण्याचे आवाहन केले.

मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही त्यांना प्रतिसाद देत डीजे मुक्त मिरवणूक काढण्याचे आश्र्वासन दिले. स पो नी डोके यांनी माहिती दिली की किनगाव पोलीस स्टेशन हद्दीत ३६ गावांमध्ये मिरवणुका निघतात १४ एप्रिल रोजी किनगाव येथे मिरवणूक आहे. व इतर ३५ गावांमध्ये १५ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान वेगवेगळ्या दिवशी मिरवणूका निघणार आहेत.

प्रत्येक गावात बीट जमादार मंडळाचे कार्यकर्ते व पोलीस पाटील यांनी मिरवणूक मार्गाची पाहणी करून काही बांधकाम साहित्य, विटा, सिमेंट मार्गात असतील तर संबंधित ग्रामपंचायती कडून मिरवणूक मार्ग मोकळा केला जाईल. तसेच महावितरण शी संपर्क साधून खाली आलेल्या तारा ओढून दुरुस्त करण्यात येतील.

मिरवणूक मार्गातील इतर धर्मियांच्या धार्मिक स्थळासमोर जाताना विशेष काळजी घ्यावी व आक्षेपार्य घोषणा / फ्लेक्स बॅनर अशा गोष्टी टाळाव्या जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होणार नाही अशा सूचना दिल्या. गावातील मिरवणुकीचे वाहन ठरवताना गावातील रस्त्याची रुंदी लक्षात घेऊन वाहन ठरवावे जेणेकरून मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडेल असेही आवाहन केले.

शांतता कमिटी बैठकीसाठी किनगाव येथील मा. सुनील वाहूळे, पत्रकार पंडितआण्णा बोडके, किनगाव ग्रामविकास अधिकारी सोमनाथ गिरी, खानापूरचे ग्रामविकास अधिकारी सुनील कांबळे हजर होते. बैठकीसाठी २०० ते २५० कार्यकर्ते हजर होते.

# मेरी लाईफ उपक्रमांतर्गत पर्यावरण पूरक कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ एप्रिल :** येथील लाल बहादुर शास्त्री माध्यमिक विद्यालयात विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग लातूर , लाल बहादुर शास्त्री माध्यमिक विद्यालय ,उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने मेरी लाईफ उपक्रमांतर्गत पर्यावरण पूरक कार्यक्रम संपन्न झाला . यानिमित्ताने विद्यालयातील इयत्ता सहावी व सातवी इयत्तेतील विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये पाणी बचत, ऊर्जा बचत,ई कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक मुक्त परिसर, स्वच्छ भारत यासारख्या विषयांवर विद्यार्थ्यांनी चित्र रेखाटले . तसेच काही विद्यार्थी प्लास्टिक व्यवस्थापन यावर आधारित मॉडेलही तयार केले होते.

याप्रसंगी वन विभागाचे अधिकारी परशुराम पवार उपस्थित होते. त्यांनी वन विभागाच्या वतीने चालणाऱ्या कार्यक्रम उपक्रमांची माहिती आपल्या भाषणातून दिली. तसेच वृक्षारोपण वृक्षसंवर्धन वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे असे आपल्या भाषणातून सांगितले .तसेच विद्यालयातील परस बागेचा ही उल्लेख त्यांनी भाषणातून केला.

याप्रसंगी लाल बहादूर शास्त्री शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह शंकरराव लासुणे मुख्याध्यापक .शैलेंद्रजी कंगळे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक विज्ञान शिक्षक राहूल नेटके यांनी केले .याप्रसंगी संपन्न झालेल्या चित्रकला स्पर्धेचे प्रमुख म्हणून कलाशिक्षक गुरुदत्त महामुनी यांनी काम केले.

# उस्तुरीतील नवीन वस्तीवरील हायटेन्शन केबल अखेर हटविले

## सरपंचांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा, आमदारांचा तत्पर हस्तक्षेप; नागरिकांची वर्षानुवर्षांची भीती दूर

**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. ०५ एप्रिल :** निलंगा तालुक्यातील उस्तुरी येथील नवीन वस्ती परिसरातील नागरिकांच्या डोक्यावर अनेक वर्षांपासून घोंगावत असलेले धोक्याचे सावट अखेर दूर झाले आहे. घरांच्या वरून जाणारी अकरा केव्हीची हायटेन्शन केबल व जिल्हा परिषद शाळेजवळील ट्रान्सफॉर्मर हटविण्यात आल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्र्वास सोडला असून सरपंचांच्या पाठपुराव्याची आणि आमदारांच्या हस्तक्षेपाची जोड मिळाल्याने हा प्रश्न मार्गी लागला.

१९९३ च्या भूकंपानंतर उस्तुरी गावातील अनेक कुटुंबांनी गावाबाहेर नवीन वस्ती करून आपला संसार उभा केला. मात्र, या वस्तीवरूनच पूर्वी टाकलेली अकरा केव्हीची हायटेन्शन केबल जात असल्याने नागरिकांना कायम जीव मुठीत धरून वास्तव्य करावे लागत होते. घरांच्या वरून जाणाऱ्या या वायरमुळे कोणत्याही क्षणी अपघात होण्याची भीती होती. परिणामी, अनेक कुटुंबांचे पक्के घर बांधण्याचे स्वप्नही अपूर्ण राहिले होते.

याशिवाय, जिल्हा परिषद शाळेजवळील ट्रान्सफॉर्मरमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही गंभीर प्रश्र्न निर्माण झाला होता. या समस्येविरोधात नागरिकांनी एकजुटीने आवाज उठवत ही बाब ग्रामपंचायतमार्फत पुढे आणली.

उस्तुरीचे सरपंच मल्लिकार्जुन दानाई यांनी या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करत तो आमदार अभिमन्यू पवार यांच्यापर्यंत पोहोचविला. त्यानंतर आमदार अभिमन्यू पवार यांनी तातडीने दखल घेत महावितरण अधिकाऱ्यांना संबंधित हायटेन्शन केबल व ट्रान्सफॉर्मर त्वरित हटविण्याच्या सूचना दिल्या. सरपंच मल्लिकार्जुन दानाई यांच्या कायम पाठपुराव्यामुळे प्रथम जिल्हा परिषद शाळेजवळील ट्रान्सफॉर्मर हटविण्यात आला आणि त्यानंतर नवीन वस्तीवरील हायटेन्शन केबलही गावाबाहेर हलविण्यात आली.

घरांवरील जीवघेणे वायर हटल्यामुळे आता नागरिकांना सुरक्षित व निर्धास्त वातावरणात जीवन जगता येणार आहे. अनेक वर्षांपासून भीतीमुळे रखडलेली घरांची स्वप्ने आता पूर्ण होण्याच्या मार्गावर आली आहेत. या कार्यामुळे नवीन वस्तीतील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आ. अभिमन्यू पवार,सरपंच मल्लिकार्जुन दानाई व महावितरणचे आभार मानले आहेत.

# जगात कोणतीच गोष्ट सहज मिळत नसून ती मेहनतीतून साध्य होते–सुरज सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ०५ एप्रिल :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला विद्यालयाचा माजी विद्यार्थी सुरज सूर्यवंशी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव लासूणे सत्कारमूर्ती सुरज सूर्यवंशी माणिकराव सूर्यवंशी सत्यभामा सूर्यवंशी मधुकरराव वट्टमवार, सतनप्पा हूरदळे, प्रकाश येरमे, व्यंकटराव गुरमे,अंजलीताई नळगिरकर, षण्मुखानंद मठपती, मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, अंकुश मिरगुडे, श्रीपाद सिमंतकर,उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार किरण नेमट, माधव मठवाले उपस्थित होते.



सर्वप्रथम सत्कारमूर्ती सुरज सूर्यवंशी व त्यांचे आई–वडील यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

सुरज सूर्यवंशी यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला तसेच यूपीएससीच्या कठीण परिक्षेला सामोरे जात असतांना मानसिक कस लागतो ,त्यामुळे विद्यार्थ्यांनी अपयशाला न घाबरता यश संपादित करावे असा मौलिक सल्ला दिला.

शाळेने केलेला सत्कार माझ्यासाठी महत्त्वपूर्ण असून त्यातून मला कार्य करण्यासाठी उर्जा मिळेल. शाळेतून मिळालेल्या संस्कारामुळे व शिक्षकांमुळे यश मिळाल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपामध्ये शंकरराव लासूणे यांनी सुरज सूर्यवंशी यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता येलमटे,प्रास्ताविक मुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे,स्वागत व परिचय नीता मोरे, वैयक्तिक प्रीती शेंडे तर आभार ज्ञानेश मातेकर यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख निता मोरे, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता येलमटे, निलेश मांडवकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता रूपाली थोरात यांच्या कल्याण मंत्राने झाली.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सुरतगावात मारहाण व सोन्याची अंगठी लुटल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ एप्रिल -**

सुरतगाव येथे जुन्या वादातून एका तरुणावर धारदार शस्त्रांनी हल्ला करून जखमी करत त्याची सोन्याची अंगठी लुटल्याची घटना घडली आहे.

या प्रकरणी सहा जणांसह अन्य व्यक्तींविरुद्ध तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ९.४५ वाजता नानासाहेब गुंड यांच्या घरासमोर सुरतगाव येथे फिर्यादी स्वप्निल ब्रम्हानंद काळे (वय २७) यांना तू आमच्या भांडणाबाबत वडिलांना का सांगितले या कारणावरून आरोपींनी जाब विचारला.

त्यानंतर आरोपी किरण कुबेर मगर, राम कोंडीबा गुंड, महेश बाबू गुंड, गणेश बाळू गुंड, ऋषीकेश महादेव गुंड, श्रीकांत गुंड (सर्व रा. सुरतगाव) तसेच इतरांनी एकत्र येत शिवीगाळ केली.

यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी कोयता, हातोडा, लोखंडी सळई व काठीने हल्ला करून फिर्यादीस जखमी करण्यात आले.

यावेळी फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी काढून घेतली.

तसेच त्यांच्या मित्रालाही मारहाण करून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# पंडित दिनदयाळ उपाध्याय निवासी प्रशिक्षण महाअभियान उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांची निर्मिती व्हावी या उद्देशाने पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ चे आयोजन संपूर्ण धाराशिव जिल्ह्यामध्ये आमदार राणाजगजीतसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर तसेच माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडत आहेत. जिल्ह्यातील संघटनात्मक १९ मंडळा पैकी १२ मंडळांमध्ये प्रमुख कार्यकर्त्यांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षण वर्गास १२ मंडळातून सुमारे १६८० हून अधिक जेष्ठ, युवा, महिला भगिनी प्रशिक्षित झाल्या आहेत. या वर्गांमध्ये वैचारिक अधिष्ठान, भारतीय जनता पार्टीचा इतिहास आणि विस्तार, पक्ष संघटन विस्ताराची दृष्टी, पक्षाची कार्यपद्धती, आपल्या सरकारची कामगिरी, सोशल मीडिया आणि ख तसेच नमो प आणि सरल प, बूथ व्यवस्थापन, मन की बात या विषयांवर सत्रांचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षण महाअभियानामध्ये १९ मंडळापैकी १२ मंडळामध्ये शिबिरांचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले असून मंडलांमधील वर्गांचे पण लवकरच पूर्ण होणार असल्याचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले.

## अत्यावश्यक असलेल्या तुळजापूर नळदुर्ग रस्त्यावरील गतिरोधक बसवण्याचे काम अखेर सुरु

नेहमीच होणाऱ्या छोट्या मोठ्या अपघातांना बसणार आळा...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ एप्रिल -**

येथील जास्त रहदारीचा तुळजापूर नळदुर्ग या महामार्ग रस्त्यावर नगरसेवकांच्या निवेदनाची दखल घेवून अखेर गतिरोधक बसवण्याचे काम सुरू करण्यात आल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

शहरातील सर्वात जास्त गर्दी या रस्त्यावर असते. या रस्त्यावर होत असल्याने छोटे-मोठे अपघात नेहमीच घडतात गतिरोधक केल्यामुळे या छोट्या-मोठ्या अपघातांवर आळा बसल्याचे नागरिकांमधून चर्चा होत आहे. गतिरोधक केल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. पूर्वीपेक्षा रस्ता चांगला झाल्यामुळे या रस्त्यावर वाहनधारक हाय स्पीडने गाड्या चालवतात तसेच सकाळ आणि संध्याकाळ पायी फिरायला जाणाऱ्या नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन व महामार्गावर असलेल्या नियमाची दखल घेऊन नागरिकांच्या जीवितेचा धोका लक्षात घेता या रस्त्यावर गतिरोधक करणे अत्यावश्यक होते.

तुळजापूर नळदुर्ग या रस्त्याचे नव्याने रुंदीकरणासह काम झालेले असून या रस्त्यावर अभियांत्रिकी

महाविद्यालय, नवोदय विद्यालय, सैनिक स्कूल, आयटीआय या शैक्षणिक संस्था आहेत तसेच राष्ट्रीयकृत . सहकारी बँका. पतसंस्था सह विविध शासकीय कार्यालय आणि नव्याने झालेले कोर्ट यामुळे दररोज विद्यार्थ्यांसह हजारो लोकांची वर्दळ दैनंदिन कामासाठी या रस्त्यावर असते.परंतु नवीन झालेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतूक ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे .तसेच पूर्वी रस्त्यावर असलेले गतिरोधक नव्याने झालेल्या या मार्गावर तांत्रिक बाबीमुळे नसल्याने वाहने सुसाट वेगाने धावत आहेत. यामुळे दररोज या रस्त्यावर छोटे मोठे अपघात वारंवार होत असल्याने व नागरिकांची मागणी लक्षात घेऊन उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी व नगरसेविका अश्विनी विशाल रोचकरी यांनी या रस्त्यावर गतिरोधक बसवण्याची मागणी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली होती व सतत याचा पाठपुरावा आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्याकडे केला.यामुळे सततच्या पाठपुरावा व नागरिकांच्या मागणीमुळे संबंधित प्रशासनाने या रस्त्यावर गतिरोधक बसवण्याचे काम सुरू केलेले आहे.याविषयी बोलताना उपनगराध्यक्ष रोचकरी यांनी समाधान व्यक्त करून सांगितले की अधिकाऱ्यांची सकारात्मक भूमिकेमुळे व आमदार पाटील यांच्या प्रयत्नमुळे काम सुरू झाले असून या कामामुळे अपघाताला आळा बसेल.

## भरधाव कारची दुचाकीला धडक; एकजण ठार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात मंगरुळ (ता. कळंब) येथील पवन राजू जाधव (वय ३३) यांचा मृत्यू झाला आहे. निष्काळजीपणे कार चालवून दुचाकीला धडक देत अपघात घडविल्याप्रकरणी संबंधित कार चालकाविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२४ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजण्याच्या सुमारास पवन जाधव हे मोटरसायकल (क्र. एम चएच २५ वाय ३७१३) वरून जात असताना, बावी येथील आश्रम शाळेजवळील राधिका हॉटेल ॲण्ड लॉज परिसरात कार (क्र. एमचएच १२ एफवाय ३९३१) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला मागून जोराची धडक दिली. या भीषण अपघातात पवन जाधव गंभीर जखमी झाले व त्यांचा मृत्यू झाला.

## धाराशिवात वाहतूक नियमभंगावर कारवाई

**धाराशिव, दि.५ एप्रिल -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून दि.३ एप्रिल रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ९५ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली.

## तुळजापूरात अनधिकृत बॅनरचा सुळसुळाट; सौंदर्याला धक्का, अपघातांचा धोका वाढला

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ एप्रिल -**

शहरात अनधिकृत बॅनर लावण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले असून, त्यामुळे शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसमोर शहराची नकारात्मक प्रतिमा निर्माण होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

राष्ट्रवादीचे नेते बबनराव गावडे यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे हे बॅनर तातडीने हटवून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

नळदुर्ग रोड, धाराशिव रोडसह प्रमुख मार्गांवरील डिव्हायडरवरील पथदिव्यांच्या खांबांवर कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावले जात आहेत. धक्कादायक बाब म्हणजे एका खांबावर तीन ते चार बॅनर थरावर थर लावले जात असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे रस्त्यावरील दृश्य झाकले जात असून वाहनचालकांना समोरील मार्ग स्पष्ट दिसत नाही.

विशेषतः रात्रीच्या वेळी व वळणाच्या ठिकाणी ही समस्या अधिक गंभीर बनत असून अपघाताचा धोका




वाढला आहे. तसेच वाऱ्यामुळे बॅनर सैल होऊन खाली पडण्याच्या घटनाही घडत आहेत. काही दिवसांपूर्वी बॅनर कोसळल्याची घटना घडली होती, सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. नियमांचे उल्लंघन करून बॅनर लावण्यावर तात्काळ अंकुश ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर तुळजापूर नगरपरिषद प्रशासनाने त्वरित कारवाई करून अनधिकृत बॅनर हटवावेत तसेच संबंधितांवर कडक दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## तुळजापुरात हरिनाम संकीर्तन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ एप्रिल -**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ व हरे कृष्ण भक्त तुळ जापूर यांच्या वतीने शहरात भव्य असे हरिनाम संकीर्तन काढण्यात आले.

सकाळी ७ वा. श्री डुल्या मारुती येथून संकीर्तनास प्रारंभ करण्यात येऊन श्री माणिक कदम यांच्या निवासस्थानी सांगता करण्यात आली. कर्ताल-मृदंगाच्या गजरात सर्वजण हरिनामात दंग झाले होते.

कलियुगात हरिनाम हा सर्वांचा धर्म असून हरिनामानेच अनेक जन्मांची पापे जळून जातात. म्हणून सर्वांनी आवडीने सतत हरिनाम घ्यावे असे प्रभूजींनी सांगितले. उन्हाचा पारा वाढत असतानाही, आपल्या लाडक्या भगवंतांच्या नामस्मरणात तल्लीन होण्यासाठी भाविकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद प्रकर्षाने जाणवत होता. बाहेर गावाहून आलेले देवी भक्तही हरिनामात दंगून जाताना दिसत होते. एकंदरीत श्रीराम फेरी उत्साही वातावरणात पार पडली. माणिक कदम प्रभूजी यांनी सर्वांसाठी प्रसादाची व्यवस्था केली होती.

अशी श्रीराम फेरी प्रत्येक महिन्यातील पहिल्या रविवारी काढण्यात येत असून गेल्या तीन वर्षापासून अविरत सेवा चालू आहे.

## नळदुर्गात प्रेमनाथ महाराज दिंडीचे जल्लोषात स्वागत



### शंभर वर्षांची परंपरा आजही कायम...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ एप्रिल -**

माडज येथील संत प्रेमनाथ महाराजांच्या दिंडीचे नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथे यंदाही उत्साहात स्वागत करण्यात आले. तब्बल शंभर वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा आजही तेवढ्याच श्रद्धा आणि भक्तिभावाने जपली जात असल्याचे चित्र पाहायला मिळाले.



दरवर्षी चैत्र महिन्यात पंढरपूरची चैत्रवारी पूर्ण झाल्यानंतर प्रेमनाथ महाराजांची दिंडी माडजकडे परतीच्या प्रवासाला निघते. त्यावेळी नळदुर्ग येथील मराठा गल्ली येथे या दिंडीचा मुक्काम असतो. यंदा ४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात आणि भजनांच्या सुरेल वातावरणात दिंडीचे आगमन झाले.

या दिंडीचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. पूर्वी ही दिंडी नळदुर्गजवळील आलियाबाद येथील हनुमान मंदिरात मुक्काम करत असे. मात्र मराठा गल्लीतील वारकरी संप्रदायाचे कै. गोपीनाथराव मुळे यांच्या विनंतीनंतर ही दिंडी मराठा गल्ली येथे येऊ लागली आणि तेव्हापासून ही परंपरा अखंड सुरू आहे. दिंडीत पालखीत प्रेमनाथ महाराजांची मूर्ती विराजमान असते. टाळ-मृदंग, हलगी आणि भजनांच्या गजरात दिंडी मजल दरमजल करत नळदुर्गमध्ये पोहोचते. आगमनावेळी स्थानिक तरुण हलगीच्या तालावर दिंडीचे स्वागत करून तिला मराठा गल्लीपर्यंत सन्मानाने घेऊन येतात. दिंडी प्रमुख ह.भ.प. श्री काळे महाराज यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. गेल्या काही वर्षांपासून कुरुक्षेत्र किल्लेदार आणि स्थानिक युवक दिंडीच्या संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहेत.

भोजनानंतर रात्री उशिरापर्यंत भजनाचा कार्यक्रम रंगतो. पहाटे ५ वाजता दिंडी माडजकडे प्रस्थान करते. दिंडीला सुखरूप निरोप देण्यासाठी युवक राष्ट्रीय महामार्गापर्यंत सोबत करतात.

## ३९ लिटर गावठी दारूसह आरोपी ताब्यात

### मुरुम पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.५ एप्रिल -**

मुरुम पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्य विक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी ३९ लिटर गावठी दारू जप्त केली आहे. या प्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रमेश रामचंद्र राठोड (वय ४२, रा. आलूर, ता. उमरगा, जि. धाराशिव) याने दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजता आलूर येथे अंदाजे ३,९०० रुपयांच्या किमतीची ३९ लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली आढळून आली. या कारवाईत पोलिसांनी सदर दारू जप्त केली असून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## एकल महिलांसाठी मार्गदर्शन मेळावा; योजनांच्या लाभासाठी पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ एप्रिल -**

साऊ एकल महिला पुनर्वसन समितीच्या वतीने एकल महिलांसाठी विशेष मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. मेळाव्यात विविध शासकीय योजनांची माहिती देत महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

या मेळाव्यात बाल संगोपन, संजय गांधी निराधार, वृद्धापकाळ, श्रावण बाळ तसेच दिव्यांग योजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. जिल्हा समन्वयक विजय (काका) जाधव यांनी सांगितले की, आई किंवा वडील गमावलेल्या ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी शासनाकडून दरमहा २,२५० रुपयांचा लाभ दिला जातो. मात्र अनेक लाभार्थ्यांना अर्ज करूनही दोन वर्षांनंतरही लाभ मिळालेला नसल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.



यासंदर्भात लाभार्थ्यांची नावे व आधार तपशील संकलित करून एक्सेल फाईल तयार केली जात असून, ती पुणे आयुक्तालयाकडे सादर करून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या नोंदणीसाठी पुणे, लातूर व उदगीर येथूनही महिला उपस्थित होत्या.

मेळाव्यात महिलांना स्वावलंबी होण्यासाठी उद्योग-व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना ऑनलाईन अर्जाद्वारे बँकांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य मिळवून दिले जाईल, अशी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला ६८ एकल महिलांची उपस्थिती होती. परित्यक्ता महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी न्यायालयीन घटस्फोट प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष काशीनाथ पाटील, विठ्ठल चिकूंद्रे, गौरी पंडित, ज्योती राजपूत, बबीता गुरव, ज्योती माने, सोनाली करपे, स्मिता जगदाळे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, २०२१ मध्ये समितीमार्फत शिलाई मशीन मिळालेल्या सात महिलांनी शिवणकामातून स्वावलंबन साधल्याचे सांगत समितीचे आभार मानले.

पुढील मेळाव्यात वंचित महिलांनी सहभागी होऊन योजनांचा लाभ घ्यावा व दलालांच्या फसवणुकीपासून दूर राहावे, असे आवाहन करण्यात आले. काही महिलांच्या पेन्शन बंद झाल्याच्या तक्रारींची दखल घेत, ई-आधार, आधार सीडिंग पावती व बँक पासबुकसह तहसील कार्यालयात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

समितीमार्फत लाभ मिळेपर्यंत पाठपुरावा केला जाणार असल्याचेही सांगण्यात आले.

